RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १११(२)] मंगळवार, ऑगस्ट ५, २०२५/श्रावण १४, शके १९४७ [पृष्ठे १७, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २८७**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑगस्ट, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अधिनियम, २०२३.**

क्रमांक मेईम-२०२२/प्र.क्र.१७३/उद्योग-३.—महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अधिनियम, २०२३ (२०२३ चा ३४) याच्या कलम २७ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन,याद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा नियम, २०२५ असे म्हणावे.

२. (१) या नियमांत,संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अधिनियम, २०२३ (२०२३ चा महा. ३४), असा आहे;

(ख) "विभाग" याचा अर्थ, शासनाचा कोणताही विभाग किंवा कोणतेही अभिकरण, स्थानिक प्राधिकरण, राज्याची मालकी असलेले महामंडळ अथवा कोणत्याही अधिनियमांन्वये किंवा नियमांन्वये घटित केलेले किंवा स्थापन केलेले किंवा शासनाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली इतर कोणतेही प्राधिकरण किंवा अभिकरण, असा आहे;

(ग) "सदस्य" याचा अर्थ, अधिकारप्रदत्त समितीचा, किंवा यथास्थिति, पर्यवेक्षकीय समितीचा सदस्य, असा आहे आणि त्यात, अध्यक्ष व सदस्य-सचिव यांचा समावेश होतो.

(२) या नियमांमध्ये वापरलेले व व्याख्या न केलेले, परंतु, अधिनियमात व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, या

अधिनियमान्वये अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आले असतील तेच अर्थ असतील.

**३. अर्ज दाखल करणे व तो निकालात काढणे.**—(१) राज्यात, नवीन औद्योगिक उपक्रम उभारण्याची किंवा विद्यमान औद्योगिक उपक्रम नियमितपणे कार्यान्वित ठेवण्याची इच्छा असणाऱ्या उद्योजकास किंवा गुंतवणूकदारास अथवा उद्योजकाने किंवा गुंतवणूकदाराने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये संबंधित कायद्यानुसार त्यासाठी आवश्यक असलेल्या विशिष्ट परवानगीसाठी वैयक्तिक अर्ज अथवा बहुविध परवानग्यांसाठी संयुक्त किंवा सामाईक अर्ज, संबंधित कायद्यानुसार, त्यासाठी आवश्यक असलेली दस्तऐवज व शुल्क यांसह इलेक्ट्रॉनिक स्वरुपात एकल खिडकी प्रणालीद्वारे करता येईल.

(२) जेव्हा संयुक्त किंवा सामाईक अर्जाच्या नमुन्यामध्ये परवानगी समाविष्ट होत नसेल तेव्हा, अर्जदार, संबंधित कायद्यान्वये त्यासाठी विहित केलेला अतिरिक्त नमुना, किंवा यथास्थिती, नमुने सादर करील.

(३) संबंधित कायद्यान्वये शुल्कासह परिपूर्ण अर्ज नमुना प्राप्त झाल्यानंतर, सादर केलेल्या प्रत्येक अर्जाकरिता एकल खिडकी प्रणालीद्वारे स्वयंचलित पोचपावती तयार करण्यात येईल आणि असा अर्ज, प्रक्रियेसाठी, उक्त स्वयंचलित प्रणालीद्वारे सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

(४) सक्षम प्राधिकारी, एकल खिडकी प्रणालीमार्फत अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये केलेला अर्ज प्राप्त झाल्यावर, संबंधित अधिनियमाच्या तरतुदींनुसार, त्यात नमूद केलेल्या तपशिलाची छाननी व तपासणी करील.

(५) जर सक्षम प्राधिकाऱ्यास, विनिर्दिष्ट कालमर्यादेत अर्ज निकालात काढण्यासाठी अर्जदाराची कोणतीही अतिरिक्त माहिती आवश्यक असेल तर, तो, एकल खिडकी प्रणालीद्वारे विनिर्दिष्ट कालमर्यादेत प्रश्न उपस्थित करील अन्यथा अर्ज निकालात काढण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यास कोणतीही अतिरिक्त माहिती आवश्यक नाही असा अन्वयार्थ लावण्यात येईल.

(६) जर सक्षम प्राधिकाऱ्याने असा अर्ज फेटाळला तर, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्याची कारणे एकल खिडकी प्रणालीवर अपलोड करण्यात येतील आणि ती डाऊनलोड करण्यासाठी अर्जदारास उपलब्ध करून देण्यात येतील.

(७) अर्जासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेची, सक्षम प्राधिकाऱ्याने उपस्थित केलेल्या प्रश्नांस, कोणत्याही असल्यास, प्रतिसाद देण्यासाठी अर्जदाराने घेतलेला कालावधी वगळून, सक्षम प्राधिकाऱ्यास, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून गणना करण्यात येईल.

(८) अर्जदाराच्या वतीने आवश्यक कारवाई करण्यासाठी अर्ज प्रलंबित असेल तर, असा अर्ज, सार्वत्रिक सुगमता असलेल्या डॅशबोर्डच्या एकत्रित दृश्यपटलावर समाविष्ट करण्यात येणार नाही.

(९) अर्जदारांकडून शुल्कापोटी जमा केलेली रक्कम, नोडल अभिकरणाच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्यात येईल आणि ती, पुनर्मेळ केल्यानंतर, बहात्तर तासांच्या आत किंवा कामाच्या तीन दिवसांच्या आत संबंधित विभागास हस्तांतरित करण्यात येईल.

**४. अर्जाचे हस्तांतरण.**—(१) जर सक्षम प्राधिकारी, विनिर्दिष्ट कालमर्यादेत अर्ज निकालात काढण्यात निष्फळ ठरला तर, नोडल अभिकरण, संबंधित कायद्यान्वये आवश्यक कारवाई करण्यासाठी असा अर्ज अधिकारप्रदत्त समितीकडे हस्तांतरित करील. अधिकारप्रदत्त समिती, खालीलप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत असा अर्ज निकालात काढील :—

| अनुक्रमांक<br>(१) | सक्षम प्राधिकाऱ्याने अर्ज निकालात काढण्याची कालमर्यादा.<br>(२) | अधिकारप्रदत्त समितीने अर्ज निकालात काढण्याची कालमर्यादा.<br>(३) |
|---|---|---|
| १ | १ ते ३० दिवस | प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत |
| २ | ३१ ते ६० दिवस | प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत |
| ३ | ६१ दिवसांपेक्षा अधिक | प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत |

(२) अधिकारप्रदत्त समितीस, त्याची लेखी कारणे नमूद करून, कालमर्यादा वाढविता येऊ शकेल.

**५. अधिकारप्रदत्त समिती.**—(१) अधिकारप्रदत्त समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेलः -

| | | |
|---|---|---|
| १. | विकास आयुक्त (उद्योग), | अध्यक्ष; |
| २. | अतिरिक्त विकास आयुक्त (उद्योग), | उपाध्यक्ष; |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, | सदस्य; |
| ४. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, | सदस्य; |
| ५. | सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, | सदस्य; |
| ६. | कामगार आयुक्त, | सदस्य; |
| ७. | अतिरिक्त उद्योग संचालक, , | सदस्य; |
| ८. | नोडल अधिकारी, महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा कक्ष (जेष्ठतम अपर जिल्हाधिकारी), | सदस्य; |
| ९. | उद्योग सहसंचालक किंवा अधिक्षकीय उद्योग अधिकारी (मैत्री), | सदस्य-सचिव. |

(२) अधिकारप्रदत्त समिती, अध्यक्ष, वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे मुंबई, नागपूर येथे किंवा अशा इतर ठिकाणी आणि अशा दिनांकास व वेळी, समितीचे कामकाज करण्यासाठी पंधरा दिवसांतून किमान एकदा बैठक घेईल.

(३) सदस्य-सचिव, अधिकारप्रदत्त समितीच्या बैठकीच्या कार्यसूचीसह, बैठकीचा दिनांक, वेळ व ठिकाण नमूद करून, तिची बैठक बोलावण्याची सूचना काढील.

(४) बैठकीला प्रत्यक्षपणे उपस्थित राहण्यास असमर्थ असलेले सदस्य, व्हिडिओ कॉन्फरन्स किंवा इतर इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे सहभागी होऊ शकतील, आणि असा सहभाग, गणपूर्तीसाठी मोजण्यात येईल.

(५) अध्यक्षासह किमान पाच सदस्य मिळून बैठकीची गणपूर्ती होईल. गणसंख्येच्या अभावी, बैठक किमान अर्ध्या तासासाठी किंवा अध्यक्ष ठरवील अशा वेळेसाठी तहकूब करण्यात येईल. जर त्यानंतरही गणपूर्ती न झाल्यास, अध्यक्ष, बैठक स्थगित करू शकेल किंवा बैठक चालू ठेवू शकेल.

(६) अधिकारप्रदत्त समितीचा सदस्य-सचिव, एखाद्या विभागाशी संबंधित असलेल्या अर्जावर निर्णय घेण्यासाठी निमंत्रित म्हणून त्यासंबंधित विभागातील संबंधित अधिकाऱ्याला अध्यक्षाच्या पूर्वमान्यतेने निमंत्रित करील.

(७) विषय ज्या विभागांशी संबंधित असेल आणि ज्याला निमंत्रित केले असेल त्या विभागाचा प्रतिनिधी अशा बैठकीला उपस्थित राहील.

(८) अध्यक्षाच्या अनुपस्थितीत, उपाध्यक्ष बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवील.

(९) समितीचा सदस्य, केवळ अपवादात्मक परिस्थितीत, कार्यसूचीवरील विषयाबाबत जो अधिकारी, विभागाच्या दृष्टीकोनाशी सुपरिचित असेल अशा निकटतम दुय्यम अधिकाऱ्यास बैठकीला उपस्थित राहण्यासाठी प्रतिनियुक्त करू शकेल किंवा प्राधिकृत करू शकेल.

(१०) अधिकारप्रदत्त समितीचा सदस्य-सचिव, तीन दिवसांच्या आत बैठकीचे इतिवृत्त तयार करील.

(११) अधिकारप्रदत्त समितीच्या अध्यक्षाच्या मान्यतेनंतर, सदस्य-सचिव, बैठकीचे इतिवृत्त मान्यतेकरीता सर्व सदस्यांना पाठवील. जर इतिवृत्त पाठविल्यापासून सात दिवसांच्या आत, कोणत्याही सूचना प्राप्त झाल्या नाही तर, ते मान्य करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. सदस्य-सचिव, तिच्या पुष्टीकरिता, इतिवृत्त पुढील बैठकीत समितीसमोर ठेवील.

**६. अधिकारप्रदत्त समितीचे अधिकार.**—अधिकारप्रदत्त समितीस, अधिनियमाच्या कलम ७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांव्यतिरिक्त पुढील अधिकार असतील :—

(क) अनुपालन केले जात असल्याचे संनियंत्रण करून आणि शीघ्र कारवाईसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांना व संबंधित प्राधिकाऱ्यांना आवश्यक ते निदेश देऊन अधिकारप्रदत्त समितीने दिलेल्या आदेशांच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे.

(ख) विलंबाच्या संभाव्य घटना टाळण्यासाठी यथोचित कारवाई करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांना सुस्पष्ट सूचना देणे व मार्गदर्शन करणे.

(ग) पारदर्शकता वाढविण्यासाठी आणि राज्यामध्ये व्यवसाय करणे सुलभ होण्यास चालना देण्यासाठी प्रक्रियात्मक सुधारणा, प्रक्रियांचे सुलभीकरण, आणि डिजिटल पर्यायाचा (सोल्युशन्सचा) स्वीकार यांची शिफारस करणे.

(घ) सुसूत्रता आणणे, सुलभीकरण करणे व अनावश्यक टप्पे वगळणे, त्यायोगे कार्यक्षमता वाढविणे व विनियमनकारी ताण कमी करणे व अनुपालन सुलभ करणे यांकरिता क्षेत्रे सुनिश्चित करण्यासाठी विद्यमान प्रक्रियांचे सर्वसमावेशक पुनर्विलोकन करण्यास सूचविणे.

(ङ) गुंतवणूक प्रोत्साहन उपक्रम सुलभ करणे, संबंधित गुंतवणूकदारांच्या अडचणी सोडविणे आणि राज्यात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व वाढविण्यासाठी धोरणात्मक सहाय्य करणे.

७. **अधिकारप्रदत्त समितीची कार्ये.**—अधिकारप्रदत्त समिती, अधिनियमाच्या कलम ८ अन्वये नेमून दिलेल्या कार्यांव्यतिरिक्त पुढील कार्ये पार पाडील :—

(क) एकल खिडकी प्रणालीवरील विविध मॉड्यूल्समार्फत प्राप्त झालेले विविध अर्ज, तक्रारी, संदर्भ, इत्यादीचे पुनर्विलोकन करणे आणि अनुज्ञेय असलेली आवश्यक कारवाई, कोणतीही असल्यास, करण्यास सक्षम प्राधिकाऱ्यांना सूचना करणे.

(ख) विपणन मोहिमा, प्रभाव पाडणारे (ब्रँडींग) उपक्रम व प्रचारात्मक साहित्य यांचा प्रभाव व प्रसार यांचे मूल्यमापन करणे. प्रोत्साहने, अर्थसहाय्ये व कर कपात अशा क्षेत्र निर्दिष्ट उपक्रमांच्या यशाचे पुनर्विलोकन करणे.

(ग) धोरणे व उपक्रम, सर्वसमावेशक, प्रतिसादात्मक व सर्व भागधारकांच्या गरजांशी सुसंगत आहेत याची सुनिश्चिती करतानाच, त्यांच्या परिणामकारकतेचे मूल्य निर्धारण करण्यासाठी विद्यमान भागधारकांसोबत विचारविनिमय करण्याचे व धोरणविषयक प्रतिक्रिया यंत्रणांचे व्यापक पुनर्विलोकन करणे.

(घ) माहिती प्रसार, गुंतवणूक प्रोत्साहन, तक्रार निवारण, इत्यादींसाठी विविध संपर्क उपक्रमांच्या मार्फत भागधारक विभागांमध्ये समन्वय वाढविणे.

(ङ) गुंतवणूक प्रकल्पांची सुरळीतपणे अंमलबजावणी करण्यासाठी आणि उद्योगानुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेली ना-हरकत प्रमाणपत्रे, मान्यता व मालवाहतूक (लॉजिस्टिकल) व्यवस्था पूर्ण झालेल्या आहेत याची खात्री करून, गुंतवणूक सामंजस्य कराराची वेळेत व यशस्वीपणे अंमलबजावणी करणे, संभाव्य अडथळे निश्चित करणे आणि ते दूर करण्यासाठी सक्रीय सहाय्य करणे.

८. **पर्यवेक्षकीय समिती.**—(१) पर्यवेक्षकीय समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

| | | |
|---|---|---|
| १. | सचिव (उद्योग), | अध्यक्ष; |
| २. | सचिव (ऊर्जा), | सदस्य; |
| ३. | सचिव (कामगार), | सदस्य; |
| ४. | सचिव (पर्यावरण), | सदस्य; |
| ५. | सचिव (महसूल), | सदस्य; |
| ६. | सचिव (नगर विकास-१), | सदस्य; |
| ७. | सचिव (नगर विकास-२), | सदस्य; |
| ८. | सचिव (ग्रामविकास), | सदस्य; |
| ९. | सचिव (वित्त), | सदस्य; |
| १०. | सचिव (विधि व न्याय), | सदस्य; |

| | | |
|---|---|---|
| ११. | सचिव (अन्न व नागरी पुरवठा), | सदस्य; |
| १२. | अध्यक्ष, (महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा कक्ष), | सदस्य; |
| १३. | अतिरिक्त विकास आयुक्त (उद्योग), | सदस्य-सचिव. |

(२) पर्यवेक्षकीय समिती, अध्यक्ष ठरवील त्याप्रमाणे मुंबई, नागपूर किंवा इतर कोणत्याही ठिकाणी तीन महिन्यांतून किमान एकदा बैठक घेईल.

(३) सदस्य-सचिव, पर्यवेक्षकीय समितीच्या बैठकीच्या कार्यसूचीसह बैठकीचा दिनांक, वेळ व ठिकाण नमूद करून, तिची बैठक बोलावण्यासाठी सूचना निर्गमित करील.

(४) अध्यक्षांसह किमान पाच सदस्य मिळून बैठकीची गणपूर्ती होईल. किमान गणसंख्येच्या अभावी, बैठक किमान अर्ध्या तासासाठी किंवा अध्यक्ष ठरवील अशा वेळेसाठी तहकूब करण्यात येईल. जर त्यानंतरही गणपूर्ती न झाल्यास, अध्यक्ष, बैठक तहकूब करू शकेल किंवा बैठक चालू ठेवू शकेल.

(५) पर्यवेक्षकीय समिती, अधिकारप्रदत्त समितीकडून संदर्भ प्राप्त झाल्यावर, अर्जावर घ्यायच्या निर्णयाबाबत अधिकारप्रदत्त समितीला शिफारस करू शकेल किंवा मार्गदर्शन करू शकेल.

(६) पर्यवेक्षकीय समितीचा सदस्य-सचिव, एखाद्या विभागाशी संबंधित असलेल्या अर्जांवर निर्णय घेण्यासाठी निमंत्रित म्हणून त्या संबंधित विभागातील संबंधित अधिकाऱ्याला अध्यक्षांच्या पूर्व मान्यतेने निमंत्रित करील.

(७) विषय ज्या विभागाशी संबंधित असेल आणि ज्याला आमंत्रित केले असेल त्या विभागाचा प्रतिनिधी, अशा बैठकीस उपस्थित राहील.

(८) अध्यक्षाच्या अनुपस्थितीत, अध्यक्षाच्या निर्देशांनुसार सदस्य बैठकीचा अध्यक्ष असेल.

(९) समितीचा सदस्य, केवळ अपवादात्मक परिस्थितीत, जो अधिकारी विभागांच्या दृष्टिकोनाशी सुपरिचित आहे अशा निकटतम दुय्यम अधिकाऱ्यास बैठकीस उपस्थित राहण्यासाठी प्रतिनियुक्त करू शकेल आणि प्राधिकृत करू शकेल.

(१०) पर्यवेक्षकीय समितीचा सदस्य-सचिव, तीन दिवसांच्या आत, बैठकीचे इतिवृत्त तयार करील.

(११) पर्यवेक्षकीय समितीच्या अध्यक्षाच्या मान्यतेनंतर, सदस्य-सचिव, बैठकीचे इतिवृत्त मान्यतेकरिता सर्व सदस्यांना पाठवील. जर इतिवृत्त पाठवल्यापासून सात दिवसांच्या आत, कोणत्याही सूचना प्राप्त झाल्या नाहीत तर, ते मान्य करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. सदस्य-सचिव, तिच्या पुष्टीकरिता, इतिवृत्त पुढील बैठकीत समितीसमोर ठेवील.

९. **पर्यवेक्षकीय समितीचे अधिकार :—**पर्यवेक्षकीय समितीस, अधिनियमाच्या कलम ११ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांव्यतिरिक्त, पुढील अधिकार असतील :—

(क) अधिकारप्रदत्त समितीने केलेल्या कारवाईचा आढावा घेणे, त्याच्या परिणामकतेचे मूल्य निर्धारण करणे, आणि वेळेवर निर्णय घेण्याची व अनुपालन करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी आवश्यक असेल त्यानुसार मार्गदर्शन करणे;

(ख) विलंबाची व अकार्यक्षमतांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत याची सुनिश्चिती करून, सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांना सुस्पष्ट सूचना देणे व मार्गदर्शन करणे;

(ग) सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांना त्यांच्या संबंधित भूमिका, जबाबदाऱ्या व कालमर्यादा यांची जाणीव आहे, आणि त्यांच्या कारवाईसाठी व निष्क्रियतेसाठी त्यांना जबाबदार धरण्यात येईल याची सुनिश्चिती करणे;

(घ) व्यापक धोरणात्मक उद्दिष्टे व सर्वोत्तम पध्दती यांच्याशी सुसंगतता राखण्याची सुनिश्चिती करून, अधिकारप्रदत्त समितीने प्रस्तावित केलेल्या व्यवसाय प्रक्रिया पुनर्रचनेवरील धोरणात्मक शिफारशींचे मूल्यमापन करणे व त्यास मान्यता देणे.

(ङ) राज्याच्या अर्थव्यवस्थेवर महत्वपूर्ण सकारात्मक प्रभाव टाकण्यासाठी शाश्वत व उच्च-प्रभाव असलेल्या गुंतवणुका आकर्षित करण्यासाठी दूरदर्शी धोरणे निश्चित करून, जागतिक भागीदारीस चालना देऊन आणि परिस्थितिकी व्यवस्था-स्तरीय उपक्रम चालवून राज्याला एक आघाडीचे गुंतवणूक पसंतीचे स्थान म्हणून दर्जा प्राप्त करून देण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शन करणे.

(च) अडथळे, अकार्यक्षमता व वाढीची क्षेत्रे निश्चित करण्यावर भर देण्याबरोबरच, आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यासाठी व निर्यात वाढीला चालना देण्यासाठी विद्यमान यंत्रणांचे व्यापक मूल्यमापन करणे.

(छ) निर्यात स्पर्धात्मकतेत वाढ करणे, निर्यात बाजारपेठांमध्ये विविधता आणणे आणि एकूणच निर्यात कामगिरी वाढवणे या उद्देशाने, सीमाशुल्क प्रक्रियांचे सुलभीकरण, इलेक्ट्रॉनिक डेटा देवाणघेवाण प्रणालींची अंमलबजावणी, मालवाहतूक व वाहतूकविषयक पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे, आणि निर्यातदारांना लक्ष्यित प्रोत्साहने व आधारभूत सेवा पुरविणे यासारख्या उपाययोजनांचा समावेश असलेली एक सुव्यवस्थित व कार्यक्षम व्यापार सुविधा संरचना स्थापना करण्याची शिफारस करणे.

१०. **पर्यवेक्षकीय समितीची कार्ये :**—पर्यवेक्षकीय समिती, अधिनियमाच्या कलम १२ अन्वये नेमून दिलेल्या कार्यांव्यतिरिक्त, पुढील कार्ये पार पाडील :—

(क) गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व महाराष्ट्र राज्याला जागतिक स्तरावर गुंतवणुकीसाठी सर्वाधिक पसंतीचे स्थान म्हणून दर्जा प्राप्त करून देण्यासाठी विविध गुंतवणूक प्रोत्साहन उपक्रमांची शिफारस करणे.

(ख) अनावश्यकता व परस्परव्याप्तता कमी करण्यासाठी विनियमांचे सुलभीकरण करण्याच्या व ते सुसंवादी करण्याचा सल्ला देणे.

(ग) विविध व्यापार प्रोत्साहन उपक्रमांवर संनियंत्रण करणे व त्याबाबत शासनास सल्ला देणे.

११. **नोडल अभिकरणाची कार्ये.**—नोडल अधिकरण, अधिनियमाच्या कलम १५ अन्वये नेमून दिलेल्या कार्यांव्यतिरिक्त, पुढील कार्ये पार पाडील :—

(क) अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता, अर्जदार, सक्षम प्राधिकारी, अधिकारप्रदत्त समिती, पर्यवेक्षकीय समिती व विविध विभाग यांमध्ये समन्वय साधणे.

(ख) अर्जांच्या स्थितीचे वेळोवेळी संनियंत्रण करणे, आणि निरीक्षणे, सूचना व शिफारशी यांसह अधिकारप्रदत्त समितीला अहवाल सादर करणे.

(ग) उद्योजकांनी किंवा गुंतवणुकदारांनी, उपस्थित केलेले प्रश्न, सक्षम प्राधिकाऱ्याच्या समन्वयाने, कामकाजाच्या सात दिवसांच्या आत सोडविणे.

(घ) न सोडवलेले प्रश्न, आवश्यकता असल्यास, अधिकारप्रदत्त समितीसमोर ठेवणे.

**(ङ) गुंतवणूक प्रोत्साहनाकरिता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (म.औ.वि.म.) समन्वयाने, पुढील कार्ये करणे :—**

(एक) जनजागृती वाढवणे आणि राज्यामध्ये येण्याकरिता गुंतवणूकदारांना सुविधा उपलब्ध करून देणे;

(दोन) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सहयोगाने, जिल्ह्यांमध्ये, राज्यांमध्ये व निवडलेल्या आंतरराष्ट्रीय ठिकाणी पथ प्रदर्शने (रोड शो) आयोजित करणे.

(तीन) संभाव्य गुंतवणूकदारांचा शोध घेण्यासाठी व राज्यामध्ये संभाव्य गुंतवणूक निर्माण करण्यासाठी दुतावास, वाणिज्य दुतावास, औद्योगिक संघटना, इतर देशांची मंत्रालये यांच्याशी सहयोग करणे.

(चार) जागतिक क्षेत्रीय कल निर्धारित करण्याकरिता स्वदेशी डेस्क उभारणे/ क्षेत्रीय विश्लेषण करणे;

(पाच) बाजारपेठेच्या अनुषंगाने - अहवाल, सारसंग्रह, नियतकालिके, लेख व इतर माहिती, शिक्षण व संप्रेषण साहित्य तयार करणे आणि त्या प्रसिध्द करणे;

(सहा) संभाव्य सामंजस्य करारावर स्वाक्षरी करणे, त्याचा पाठपुरावा व संनियंत्रण करणे, गुंतवणूक प्रस्थापनेत सहाय्य करणे;

(सात) गुंतवणुकीशी संबंधित माहिती असलेल्या संभाव्य संधी ओळखण्यासाठी व त्यास सहाय्य करण्यासाठी व्यापारी संस्थेसोबत सहयोग करणे;

(आठ) साहसी भांडवलदार/एंजेल गुंतवणूकदार यांच्यासोबत संबंध प्रस्थापित करणे;

(नऊ) विदेशात राहणाऱ्या मराठी स्थलांतरितांसोबत संबंध प्रस्थापित करणे आणि महाराष्ट्रामध्ये गुंतवणुकीकरिता त्यांना प्रोत्साहन देणे;

(दहा) खरेदीदार-विक्रेता संबंध प्रस्थापित करण्यासाठी व्यासपीठ निर्माण करणे आणि त्यास चालना देणे.

**(च) महाराष्ट्रामध्ये व्यवसाय उभारण्यासाठी गुंतवणूकदारांना पुढील सुविधा पुरविणे :—**

(एक) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळेतर उपलब्ध भू-खंडाच्या) सहयोगाने भू-बँकेबाबतची माहिती प्रसिध्द करणे;

(दोन) गुंतवणुकीकरिता सुयोग्य जमीन निश्चित करताना गुंतवणूकदारांना सहाय्य करणे;

(तीन) शासन ते व्यवसाय (G २ B) सेवा / मान्यता / निपटारा / परवानग्या / ना-हरकत प्रमाणपत्रे यांची ओळख पटविण्याकरिता सहाय्य करणे आणि अर्ज भरण्यामध्ये मदत करणे;

(चार) विविध धोरणांची माहिती पुरविणे आणि गुंतवणूकदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे;

(पाच) गुंतवणूकदारांकरिता, गुंतवणुकीशी संबंधित असलेली सर्व प्रकारची माहिती (भू-बँक, धोरणे, आवश्यक असलेल्या परवानग्या इ.) यांचे ज्ञान केंद्र म्हणून सेवा करणे;

(सहा) गुंतवणूकदारांना, महाराष्ट्रामध्ये त्यांचा व्यवसाय उभारणे सुलभ होण्यासाठी दूरभाष केंद्र (कॉल सेंटर) स्थापन करणे.

**(छ) पुढील गोष्टी करून, तक्रार निवारण यंत्रणा विकसित करणे :—**

(एक) गुंतवणूकदारांसाठी तक्रार निवारण ऑनलाईन मंच निर्माण करणे;

(दोन) तक्रारींचे वेळेवर निवारण करण्याकरिता तक्रारदार व सक्षम प्राधिकारी यांच्यासोबत समन्वय साधणे;

(तीन) आवश्यक व वेळेवर हस्तक्षेप करण्यासाठी प्राप्त झालेल्या तक्रारी, अधिकारप्रदत्त समितीकडे पाठविणे;

(चार) वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि प्रसिध्दिपत्रके तयार करणे, गुंतवणूकदारांच्या तक्रारींच्या स्थितीची अद्ययावत माहिती देणारी व तक्रारींचा पाठपुरावा करणारी सुविधा पुरविणारे डॅशबोर्ड विकसित करणे;

(पाच) तक्रारींचे निवारण करण्यासाठी घेतलेले निर्णय तक्रारदारास कळविणे.

**(ज) निर्यात प्रोत्साहनासाठी समर्पित असलेला एक कक्ष स्थापन करणे आणि राज्यातील निर्यातदारांना सुविधा पुरविणे, यांसाठी, :—**

(एक) राज्याकरिता धोरणात्मक दस्तऐवज (व्हिजन डॉक्युमेंट) आणि वार्षिक निर्यात योजना तयार करणे. कक्ष, जिल्ह्यांकरिता वार्षिक निर्यात योजना तयार करण्यासाठी सर्व जिल्ह्यांना सुविधा पुरवील;

(दोन) आंतरराष्ट्रीय व्यापार संस्था, निर्यात प्रोत्साहन परिषदा, शैक्षणिक संस्था, खरेदीदार व विक्रेते यांच्यासोबत समन्वय साधणे;

(तीन) उत्पादनांच्या प्रमाणनाच्या अधिस्वीकृतीसाठी, राष्ट्रीय चाचणी व अंशशोधन प्रयोगशाळा अधिस्वीकृती मंडळ (एनएबीएल) स्थापन करण्यासाठी जिल्ह्यांना सुविधा पुरविणे;

(चार) गुणवत्ता प्रमाणपत्रे व मूळ स्त्रोत प्रमाणपत्रे मिळविण्याकरिता गुंतवणूकदारांना सुविधा पुरविणे;

(पाच) जागतिक मागणीनुसार, उत्पादनांचे संकल्पन, आवेष्टन, चिंन्हाकन व पणन करण्यासाठी गुंतवणुकदारांना सहाय्य करणे;

(सहा) निर्यातदार, उत्पादक, वस्तूनिर्माते व भागधारक यांची क्षमता विकास करणे;

(सात) जागतिक पुरवठा साखळी मागण्यांचे संशोधन व विश्लेषण केल्यानंतर, माहिती व अहवाल प्रसिध्द करणे;

(आठ) खरेदीदार-विक्रेता मेळावा, परिषदा, प्रदर्शने व जागरुकता मोहिमा आयोजित करणे;

(नऊ) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये व मेळाव्यांमध्ये (एक्सपो) सहभागी होण्यासाठी निर्यातदारांना व प्रदर्शकांना वित्तीय सहाय्य पुरविणे;

(दहा) एक जिल्हा-एक उत्पादन यांस प्रोत्साहन देणे.

**(झ) धोरण व संशोधन :—**

(एक) वर्षनिहाय तत्त्वावर धोरण प्रभाव विश्लेषण करणे आणि विद्यमान धोरणांच्या प्रगतीचे किंवा कामगिरीचे पुनर्विलोकन करणे;

(दोन) प्रभाव विश्लेषणांच्या मापदंडांसह (बेंचमार्क) इतर राज्यांच्या व देशांच्या मापदंड (बेंचमार्क) धोरणांचा अभ्यास करणे;

(तीन) धोरणाचा मसुदा तयार करणे आणि तो सादर करणे;

(चार) भागधारकांसोबत विचारविनिमय करणे, धोरणाच्या मसुद्यावर प्रतिक्रिया किंवा सूचना मागविणे किंवा तफावत विश्लेषण अहवाल सादर करणे;

(पाच) धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफ ए क्यू), प्रमाण कार्यान्वयन कार्यपध्दती (एसओपी) आणि कार्यक्षेत्रांचा पथदर्शक आराखडा (रोडमॅप) निश्चित करणे व तयार करणे.

**(ञ) व्यवसाय सुलभता व व्यवसाय सुधारणा :—**

(एक) उद्योगांशी/औद्योगिक संघटनांशी विचारविनिमय करून, राज्य व केंद्रीय अशा दोन्ही स्तरांवरील, विविध अधिनियम/नियम/विनियम/अधिसूचना या खालील तरतुदींचा / आवश्यकतांचा सविस्तर अभ्यास करणे;

(दोन) जागतिक स्तरावरील मान्यताप्राप्त सर्वोत्तम पध्दतीसाठी मापदंड (बेंचमार्क) अध्ययन अहवाल तयार करणे;

(तीन) केंद्र सरकारच्या शिफारशींनुसार व्यवसाय सुलभता सुधारणांचे विश्लेषण करणे आणि त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता, आवश्यक कार्यवाहींसाठी संबंधित प्राधिकाऱ्यांना सहाय्य करणे;

(चार) सुधारणांकरिता शिफारशी करण्याबरोबरच, विविध सेवा प्रक्रिया, नमुने, आवश्यक दस्तऐवज, अधिसूचित कालमर्यादा व विविध सेवांचे सांविधिक शुल्क यांचे नव्याने विश्लेषण करणे;

(पाच) व्यवसाय उभारण्याकरिता विविध विभाग, सक्षम प्राधिकारी व भागधारक यांच्या समन्वयाने मान्यता किंवा परवाने किंवा परवानग्या मिळविण्याची प्रक्रिया सुलभ करणे;

(सहा) राज्यात व्यवसाय करण्याचा खर्च व विनियमन करण्याचा खर्च यांचा अभ्यास करणे आणि संबंधित प्राधिकाऱ्याला सुधारात्मक उपाययोजना करण्यास / आवश्यक कारवाई करण्यास सुचविणे.

**(ट) डिजिटल परिवर्तन :—**

(एक) गुंतवणूकदारांना सुविधा पुरविण्याच्या, एकल खिडकी प्रणालीसाठी, ऑनलाईन पोर्टल विकसित करणे व त्याचे परिरक्षण करणे;

(दोन) संबंधित एजन्सी, विभाग व भारत सरकारचे पोर्टल यांच्यासोबत ऑनलाईन एकल खिडकी प्रणाली (मैत्री पोर्टल) एकात्म करणे;

(तीन) विविध धोरणांनुसार उद्योग उभारण्याकरिता आवश्यक असलेल्या नवीन जी २ बी (शासन ते व्यवसाय), सेवा निश्चित करणे व सुरू करणे.

**(ठ) अर्थसंकल्प व प्रशासन :—**

(एक) प्रत्येक वित्तीय वर्षाकरिता, वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे आणि तो शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे;

(दोन) विविध उपक्रम व कार्यक्रम व नियमित खर्च यांसाठी, निधीच्या उपलब्धतेकरिता आवश्यक तरतुदी करणे;

(तीन) केलेल्या खर्चाचा आणि व्यवस्थापन माहिती प्रणालीचा हिशोब किंवा अभिलेख ठेवणे;

(चार) सेवाप्रवेश, मानधन, लाभ व हक्क, इत्यादींसह मनुष्य बळाशी संबंधित असलेल्या बाबींचे व्यवस्थापन करणे.

(पाच) दैनंदिन कामकाज पार पाडणे आणि संबंधित भागधारकांशी समन्वय साधणे.

**१२. शासनाचे निदेश.**—राज्य शासन, अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असलेले सर्वसाधारण किंवा विनिर्दिष्ट निर्देश वेळोवेळी, पर्यवेक्षकीय समितीला किंवा अधिकारप्रदत्त समितीला किंवा अभिकरणाला देईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. पी. अन्बलगन,**
शासनाचे सचिव.

## INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 5th August, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA INDUSTRY, TRADE AND INVESTMENT FACILITATION ACT, 2023.

No. MEM-2022/C.R.173/Industries-3.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 27 of the Maharashtra Industry, Trade and Investment Facilitation Act, 2023 (Mah. XXXIV of 2023), the Government of Maharashtra hereby makes the following rules for the purposes of the said Act, namely :—

**1.** These rules may be called the Maharashtra Industry, Trade and Investment Facilitation Rules, 2025.

**2.** (1) In these rules unless the context otherwise requires,—

(*a*) "Act" means the Maharashtra Industry, Trade and Investment Facilitation Act, 2023 (Mah. XXXIV of 2023);

(*b*) "Department" means any Department or agency of the Government, Local Authority, State owned corporation or any other authority or agency constituted or established under any Act or rules or under administrative control of the Government;

(*c*) "Member" means a member of the Empowered Committee or Supervisory Committee, as the case may be, and includes its Chairman and Member-Secretary.

(2) Words and expressions used in these rules and not defined herein, but are defined in the Act, shall have the same meanings as are respectively assigned to them under the Act.

**3.** *Filing and disposal of application*.—(1) An entrepreneur or investor or any other person duly authorised by entrepreneur or investor, desiring to set up a new industrial undertaking or continuing operation of an existing industrial undertaking in the State, may make an individual application for specific permission or combined or common application for multiple permissions, required therefor under the relevant law under sub-section (*1*) of section 3 of the Act, in electronic form, through the Single Window System accompanied by necessary documents and fees required as per the relevant law.

(2) Where the permission is not covered by the combined or common application form, the applicant shall file an additional form or forms, as the case may be, prescribed therefor under the relevant law.

(3) On receipt of complete application form accompanied by the fee under relevant law, an automated acknowledgement shall be generated through the Single Window System for every submitted application and such application shall be forwarded through the said system automatically to the Competent Authority for processing.

(4) The Competent Authority shall, on receipt of an application made under sub-section (*1*) of section 3 of the Act through Single Window System, scrutinize and examine the details stated therein as per the provisions of relevant law.

(5) If the Competent Authority requires any additional information from the applicant, for disposal of the application within specified time limit, it shall raise query through the Single Window System within specified time limit otherwise it shall be construed that no additional information is required by the Competent Authority for disposal of application.

(6) If the Competent Authority rejects such application, then the reasons specified therefor shall be uploaded on the Single Window system by the concerned Competent Authority and it shall be made available to the applicant for downloading the same.

(7) The specified time limit for an application shall be computed from the date of receipt of an application by the Competent Authority, excluding the period attributable to the time taken by the applicant to respond to queries, if any, raised by the Competent Authority.

(8) An application for which actions on behalf of applicant is pending shall not be included in the aggregated view of the publicly accessible dashboard.

(9) The payments collected towards fees from applicants shall be deposited in a separate bank account in Nodal Agency and shall be transferred to the respective Department within seventy-two hours or within three working days after reconciliation.

**4.** *Transfer of application.*—(1) If the Competent Authority fails to dispose off an application within specified time limit, then the Nodal Agency shall transfer such application to the Empowered Committee for taking necessary action under the relevant law. The Empowered Committee shall dispose off such application within the specified time limit as under :—

| Sr. Nos. (1) | Time limit for disposal of application by Competent Authority. (2) | Time limit for disposal of application by Empowered Committee (3) |
|---|---|---|
| 1. | 1 to 30 days | Within 15 days from the date of receipt. |
| 2. | 31 to 60 days | Within 30 days from the date of receipt. |
| 3. | exceeding 61 days | Within 45 days from the date of receipt. |

(2) The time limit may be extended by the Empowered Committee by specifying the reasons therefor in writing.

**5.** *Empowered Committee.*—(1) The Empowered Committee shall consist of the following members, namely :—

| | | |
|---|---|---|
| 1. | Development Commissioner (Industries) | Chairman; |
| 2. | Additional Development Commissioner (Industries), | Vice-Chairman; |
| 3. | Chief Executive Officer, Maharashtra Industrial Development Corporation, | Member; |
| 4. | Chairperson and Managing Director, Maharashtra State Electricity Distribution Company Limited , | Member; |
| 5. | Member Secretary, Maharashtra Pollution Control Board, | Member; |
| 6. | Commissioner of Labour, | |
| 7. | Additional Director of Industries, | Member; |
| 8. | Nodal Officer, Maharashtra Industry, Trade and Investment Facilitation Cell (Senior most Additional Collector), | Member; |
| 9. | Jt. Director of Industries or Superintending Industries Officer (MAITRI), | Member-Secretary. |

(2) The Empowered Committee shall meet at least once in fifteen days at Mumbai, Nagpur or such other place and on such date and time as the Chairman may specify, from time to time, to transact its business.

(3) The Member-Secretary shall issue a notice for convening a meeting of the Empowered Committee indicating a date, time and place of the meeting including agenda of the meeting.

(4) The Members unable to attend in person may participate via video conference or other electronic means, and such participation shall count towards the quorum.

(5) The quorum of the meeting shall be minimum five members including the Chairman. In the absence of quorum, the meeting shall be postponed for minimum of half an hour or as decided by the Chairman. Thereafter, if the quorum is not present, then the Chairperson may adjourn the meeting or continue with the meeting.

(6) The Member-Secretary of the Empowered Committee shall, with the prior approval of Chairperson, invite the concerned officer from the relevant Department as an Invitee to decide the application related to that Department.

(7) The representative from the Department to which the issue pertains and who is invited shall remain present in such meeting.

(8) In the absence of the Chairman, the meeting shall be chaired by the Vice- Chairman.

(9) The Member of the Committee may, only in exceptional circumstances, depute and authorize the immediate subordinate to attend the meeting who shall be well conversant of views of the Department on the agenda.

(10) The Member-Secretary of the Empowered Committee shall prepare the minutes of the meeting within three days.

(11) After approval of the Chairman of the Empowered Committee, the Member-Secretary shall circulate the minutes of the meeting among all the members for perusal. If any suggestions are not received within seven days from the dispatch of minutes, it shall be deemed to be confirmed. The Member-Secretary shall place the minutes before the Committee in next meeting for it's confirmation.

**6.** *Powers of the Empowered Committee.*—The Empowered Committee shall, in addition to the powers conferred under section 7 of the Act, have the following powers, namely :—

(*a*) To ensure execution of the orders passed by the Empowered Committee by monitoring compliance and issuing necessary directions to the Competent Authority and concerned authorities for expeditious actions.

(*b*) To provide clear instructions and guidance to Competent Authorities to ensure appropriate action to prevent future occurrences of delays.

(*c*) To recommend process improvements, simplification of procedures, and adoption of digital solutions to enhance transparency and promote Ease of Doing Business in the State.

(*d*) To suggest to conduct a comprehensive review of existing procedures to identify areas for streamlining, simplification and elimination of unnecessary steps, thereby enhancing efficiency and reducing regulatory burdens and facilitating compliance.

(*e*) To facilitate investment promotion initiatives, address investor concerns and provide strategic support to attract and augment investments in the State.

**7.** *Functions of Empowered Committee.*—The Empowered Committee shall, in addition to the functions assigned under section 8 of the Act, perform the following functions, namely :-

(*a*) To take review of various applications, grievance, references, etc., received through various modules on the Single Window System and instruct Competent Authorities to take applicable necessary actions, if any.

(*b*) To evaluate the impact and reach of marketing campaigns, branding initiatives and promotional materials. Review the success of sector-specific initiatives, such as incentives,

subsidies, and tax breaks.

(*c*) To undertake a comprehensive review of the existing stakeholder consultation and policy feedback mechanisms to assess their effectiveness in ensuring that policies and initiatives are inclusive, responsive and aligned with the needs of all stakeholders.

(*d*) To enhance co-ordination with stakeholder Departments through various outreach initiatives for information dissemination, investment promotion, grievance resolution, etc.

(*e*) To facilitate the timely and successful implementation of investment Memorandum of Understanding (MoUs), identify potential obstacles, and provide proactive support to resolve them, ensuring that all necessary clearances, approvals, and logistical arrangements are in place to enable the smooth execution of investment projects and foster a favourable business environment.

(*f*) To review, evaluate, and propose strategic recommendations related to Business Process Re-engineering (BPR) initiatives, ensuring they align with the overarching policy goals, promote administrative efficiency, and reflect best practices in governance and service delivery.

**8.** *Supervisory Committee.*—(1) The Supervisory Committee shall consist of the following members, namely:—

| | | |
|---|---|---|
| 1. | Secretary (Industries), | Chairperson; |
| 2. | Secretary (Energy), | Member; |
| 3. | Secretary (Labour), | Member; |
| 4. | Secretary (Environment), | Member; |
| 5. | Secretary (Revenue), | Member; |
| 6. | Secretary (Urban Development – 1), | Member; |
| 7. | Secretary (Urban Development –2), | Member; |
| 8. | Secretary, (Rural Development), | Member; |
| 9. | Secretary, (Finance) | Member; |
| 10. | Secretary, (Law and Judiciary), | Member; |
| 11. | Secretary, (Food and Civil Supply), | Member; |
| 12. | Chairperson, Maharashtra Industry, Trade and Investment Facilitation Cell, | Member; |
| 13. | Additional Development Commissioner (Industries), | Member- Secretary. |

(2) The Supervisory Committee shall meet at least once in three months at Mumbai, Nagpur or any other place as the Chairman may decide to transact its business.

(3) The Member-Secretary shall issue a notice for convening a meeting of the Supervisory Committee indicating a date, time and place of the meeting including agenda of the meeting.

(4) The quorum of the meeting shall be minimum five members including Chairperson. In the absence of minimum quorum, the meeting shall be postponed for minimum of half an hour or as decided by the Chairman. Thereafter, if the quorum is not present then the Chairperson may adjourn the meeting or continue with the meeting.

(5) The Supervisory Committee after receiving reference by Empowered Committee shall recommend or guide the Empowered Committee to take decision on the application.

(6) The Member-Secretary of the Supervisory Committee shall, with the prior approval of Chairman, invite the concerned officer from the relevant Department as an Invitee to decide the applications related to that Department.

(7) The representations from the Departments to which the issue pertains and who is invited shall remain present in such meeting.

(8) In the absence of the Chairman the meeting shall be chaired by the member as per directions of the Chairman.

(9) The member of the Committee shall only in exceptional circumstances, depute and authorize the immediate subordinate to attend the meeting who shall be well conversant of views of the Department.

(10) The Member-Secretary of the Supervisory Committee shall, within three days, prepare the minutes of the meeting.

(11) After approval of the Chairman of the Supervisory Committee, the Member-Secretary shall circulate the minutes of the meeting among all the members for perusal. If any suggestions are not received within seven days from the dispatch of minutes, it shall be deemed to be confirmed. The Member-Secretary shall place the minutes before the Committee in next meeting for it's confirmation.

**9.** *Powers of Supervisory Committee.*-—The Supervisory Committee shall, in addition to the powers conferred under section 11 of the Act, have the following powers, namely:-

(*a*) To review the actions taken by the Empowered Committee, assess their effectiveness, and guide as necessary to ensure timely resolution and compliance.

(*b*) To give explicit instructions and guidance to all the competent authorities, ensuring that requisite measures are taken to prevent recurrences of delays and inefficiencies.

(*c*) To ensure that all the competent authorities are aware of their respective roles, responsibilities, and timelines, and that they are held accountable for their actions and inactions.

(*d*) To evaluate and approve strategic recommendations on Business Process Re-engineering proposed by the Empowered Committee, ensuring alignment with broader policy objectives and best practices.

(*e*) To provide strategic guidance for positioning the State as a leading investment destination by formulating visionary policies, fostering global partnerships, and driving ecosystem-level initiatives to attract sustainable and high-impact investments to have a significant positive impact on a state's economy.

(*f*) To undertake a comprehensive evaluation of existing mechanisms to bolster international trade and augment export growth, with a focus on identifying bottlenecks, inefficiencies, and areas for enhancement.

(g) To provide recommendations to establish a streamlined and efficient trade facilitation framework, encompassing measures such as simplification of customs procedures, implementation of electronic data interchange systems, enhancement of logistics and transportation infrastructure, and provision of targeted incentives and support services to exporters, ultimately aimed at increasing export competitiveness, diversifying export markets, and boosting overall export performance.

**10.** *Functions of Supervisory Committee :*—The Supervisory Committee shall, in addition to the functions assigned under section 12 of the Act, have to perform the following functions, namely:-

(*a*) To recommend various investment promotion initiatives that attracts investments and position the State of Maharashtra as globally most preferred destination for investments.

(*b*) To advise on simplification and harmonize regulations to reduce redundancy and overlap.

(*c*) To monitor and advise the Government on various trade promotion activities.

**11.** *Functions of Nodal Agency.*—The Nodal Agency shall, in addition to the functions assigned under section 15 of the Act, exercise the following functions, namely :—

(*a*) To coordinate between applicant, competent authority, Empowered Committee, Supervisory Committee, and various Departments for effective implementation of the Act.

(*b*) To monitor the status of applications, from time to time, and shall submit the report with observations, suggestions and recommendations to the Empowered Committee.

(*c*) To resolve the queries raised by entrepreneurs or investors within seven working days in coordination with the Competent Authority.

(*d*) To place the unresolved queries before the Empowered Committee, if required.

(*e*) To function, in co-ordination with Maharashtra Industrial Development Corporation (MIDC), for investment promotion by,—

(*i*) raising awareness and facilitating investors coming to the State;

(*ii*) conducting roadshows across districts, States and chosen international destinations in collaboration with MIDC;

(*iii*) collaborating with National and foreign Embassies, Consulates, Industry Associations, Ministries of other countries to identify potential investors and generate potential investments in the State;

(*iv*) setting up of Country desks / Sectoral analysis to determine global sectoral trends;

(*v*) creating and publishing marketing collaterals – reports, compendium, journals, articles, and other Information, Education and Communication (IEC) material;

(*vi*) signing, Tracking and Monitoring of potential MoUs, followed by assistance in establishment of investments;

(*vii*) collaborations with Trade Bodies to identify and assist potential leads with investment related information;

(viii) establish connects with Venture Capitalists/ Angel Investors;

(ix) establish connect with Marathi diaspora living abroad and encourage them to invest in Maharashtra;

(x) create and promote a platform to establish Buyer-seller connect.

(*f*) To facilitate investors for setting up their businesses in Maharashtra by,—

(*i*) publishing information on 'land bank' in association with MIDC (of MIDC and non – MIDC available land parcels.);

(*ii*) assisting the investors in identification of suitable land for investment;

(*iii*) providing assistance towards identification of Government to business (G2B) services/approvals/ clearances/ permissions/ NOCs and support in filing of applications;

(*iv*) providing information on various policy and responding to queries raised by investors;

(*v*) serving as a Knowledge Centre for investors with all kinds of information related to investment (land bank, policies, permissions required, etc.);

(*vi*) establishing a call centre to facilitate the investors in setting up their businesses in Maharashtra.

(g) To develop a Grievance Redressal mechanism by,—

(*i*) creating an online grievance redressal platform to the investors;

(*ii*)co-ordinating with complainant and Competent Authorities for timely redressal;

(*iii*) escalating the grievances to the Empowered Committee for necessary and timely intervention;

(*iv*) preparation of FAQs, handouts, developing a dashboard for providing updates and to create facility for tracking grievance of the investors;

(*v*) communicating resolutions for redressals to the complainant.

(*h*) To establish a cell dedicated to Export Promotion and facilitate exporters from the State by,—

(*i*) preparing vision document and annual export plan for the State. The cell will also facilitate all the districts to prepare annual export plan for the districts;

(*ii*) co-ordinating with International Trade Bodies, Export promotion Councils, Educational Institutions, and Buyers and Sellers;

(*iii*) Facilitating districts to establish National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories ( NABL) accredition for certification of the products;

(*iv*) facilitating exporters in obtaining Quality certifications and Certificate of Origin;

(*v*) supporting exporters in designing, packaging, branding, and marketing of products as per the global demand;

(*vi*) capacity building of exporters, producers, manufacturers, and stakeholders;

(*vii*) publishing data and reports after research and analysis of Global Supply-Chain demands;

(*viii*) organizing buyer-seller meet, conferences, exhibitions and awareness campaigns;

(*ix*) providing financial assistance to exporters and exhibitors for participation in national and international exhibitions and expos;

(*x*) promoting One-District-One-Product.

*(i) Policy and research.—*

(*i*) to conduct policy impact analysis year-on-year basis and review of progress or performance of existing policies;

(*ii*) to conduct study for Benchmarking Policies of other States and Countries, along with Benchmarking of Impact Analysis;

(*iii*) to prepare and submit the policy draft;

(*iv*) to conduct stakeholder consultations, collect and submit the feedback or suggestions or gap analysis report on policy drafts;

(*v*) to identify and prepare Frequently Asked Questions (FAQ), Standard Operating Procedure (SOP) and Roadmap for action areas for effective implementation of the policies.

(j) *Ease of Doing Business and Business Reforms.—*

(*i*) to conduct detailed study of provisions/ requirements under various Acts/ Rules/ Regulations/ Notifications, both at the State-level and Central-level in Consultation with Industries/ Industry Associations;

(*ii*) to prepare benchmarking study report for globally recognized best practices;

(*iii*) to conduct analysis and assist concerned authorities for necessary actions for implementation of Ease of Doing Business reforms as per recommendations by Central Government;

(*iv*) to conduct de-novo analysis on different service processes, forms, document requirements, notified timelines and statutory fee of various services, along with recommendations for improvement;

(*v*) to simplify the processes for approval or licenses or permissions for setting up business in coordination with various department, competent authorities and stakeholders;

(*vi*) to conduct study on Cost of Doing Business and Cost of Regulation across the State and suggest the corrective measures/ necessary actions to the concerned authority.

(*k*) *Digital Transformation.—*

(*i*) to develop and maintain an online portal for single window system to facilitate investors.

(*ii*) to integrate online single window system (MAITRI portal) with relevant agencies, department, and Central Government portals;

(*iii*) to identify and onboard new G2B services required for setting up industries under various policies.

(*l*) *Budget and Administration.—*

(*i*) to prepare and submit annual budget for approval of the Government for each financial year;

(*ii*) to make necessary provisions for availability of funds for various initiatives and activities and routine expenses;

(*iii*) to maintain accounts or records for the incurred expenses and Management Information System;

(*iv*) to manage human resource related matters, including recruitment, remunerations, benefits and entitlements, etc.;

(*v*) to carry out day to day business and co-ordination with relevant stakeholders.

**12.** *Government Directions.*—The State Government may, from time to time, issue general or specific directions to the Supervisory Committee or the Empowered Committee or the Agency, consistent with the provisions of the Act, as may be deemed necessary or expedient for the purpose of carrying out the purposes of the Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. P. ANBALAGAN,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.